# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### सीआरझेड बाधीत जमिनींचा सातबारा मच्छिमारांच्या नावे नसल्याबाबत

**(१) ४५४९० (२७-१०-२०२२).श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह ठाणे, पालघर जिल्ह्यातील कोळीवाड्यांच्या राहत्या घरांच्या जमिनी सरकारी असुनही सीआरझेड बाधीत असल्याने या जमिनींचा सातबारा मच्छिमारांच्या नावे नसल्याने घरांची देखभाल-दुरुस्ती करण्यासाठी अनेक अडचणी येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील कोळीवाड्यांच्या जमिनी मुंबई पोर्ट ट्रस्ट व सरकारी मालकीच्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू जमिनींवर असलेल्या मच्छिमार भूमिपुत्रांना स्वतःची घरे आणि मासे सुकवण्याच्या जमिनीचा सातबारा त्यांच्या स्वतःच्या नावे करुन मिळावा अशी मागणी मच्छिमार समितीने शासनाकडे केली हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०७-२०२३) :** (१) व २) अंशत: खरे आहे.

मुंबई शहर जिल्हयामधील शिवडी, वरळी, कुलाबा तसेच कफपरेड वसाहतीमधील सिमांकन झालेल्या क्षेत्रामधील जमीनी मुंबई पोर्ट ट्रस्ट व शासनाच्या मालकीच्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

ठाणे जिल्हयात प्रामुख्याने ठाणे, बेलापूर व मिरा-भाईंदर या परिसरात कोळीवाडे आहेत. यापैकी काही घरे खाजगी जमिनीवर आहे. तथापि, बेलापूर परिसरातील जमिनी या सिडकोने संपादित केलेल्या आहेत. मिरा-भाईंदर परिसरातील मौजे उत्तन व चौक या गावातील खाडीलगतच्या जमिनीवर कोळीवाडे आहेत.

पालघर जिल्हयातील काही मच्छिमार बांधव गावठाण जागेत राहत असून त्यांची नोंद ग्रामपंचायत कार्यालयात आहे. तसेच काही मच्छिमार समुद्रकिना-याजवळ तयार झालेल्या मळईच्या जमिनीच्या ठिकाणी राहतात.

(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

मच्छीमारांच्या गावालगतच्या/वसाहतीलगतच्या खुल्या सरकारी जागा स्थानिक मच्छिमारांच्या धंद्याकरीता म्हणजेच मासे सुकविणे, जाळी सुकविणे, जाळी विणणे, बोटी दुरूस्त करणे, बोटी शाकारणे या करीता वापराची मुभा या विभागाच्या दिनांक ०४/०२/१९८२ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेली आहे.

ठाणे जिल्हयातील सीआरझेड बाधित मौज उत्तन येथील सर्व्हे नं.३४९अ/१, २९५अ/१/अ, मधील काही क्षेत्र तसेच मौजे चौक येथील काही क्षेत्राच्या ७/१२ च्या इतर हक्कात स्थानिक मच्छिमारांना मच्छि सुकविणे, जाळी विणणे, बोटी दुरुस्त करणे अशा नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. पालघर जिल्हयातील काही गावांमधील ७/१२ च्या इतर हक्कात स्थानिक मच्छिमारांना मच्छि सुकविणे, जाळी विणणे, बोटी दुरुस्त करणे अशा नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

तसेच किनारपट्टीलगत असलेल्या जिल्ह्यातील समुद्र किनारी व खाडी किनारी असलेल्या महसूली गाव नकाशाची अंतिम सीमा रेषा ते समुद्राच्या व खाडीच्या उच्चतम भरती रेषा या दरम्यान तयार झालेल्या जमिनींचे सर्वेक्षण व मोजणी करून वापराच्या अनुषंगाने सविस्तर कार्यपद्धती शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण-२०१७/प्र.क्र. ६७/ल-१, दिनांक १३ एप्रिल २०२२ अन्वये जाहिर करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तेल्हारा ( जि.अकोला) तालुक्यात सोयाबीन उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडल्याबाबत**

**(२) ४८९८४ (३०-१०-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यात सोयाबीन पिकावर मोझॅक रोग पसरल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागात वन्य प्राणी उभ्या सोयाबीनची नासाडी करीत असतानाही प्रशासनाकडून कोणतीच मदत शेतकऱ्यांना होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पिकाच्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना शासनाकडून कोणती मदत करण्यात येणार काय, त्याचे स्वरूप काय याबाबत शासनाने शेतकऱ्यांना मदत मिळण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

( ४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (३०-०६-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

वन्य प्राण्यांकडून पिकांची नासाडी झाल्यास महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार पिकाची नुकसान भरपाई करण्यात येते.

त्यानुसार तेल्हारा तालुक्यात सन २०२० मध्ये खालीलप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | पिकाचे नाव | मंजूर प्रकरणांची संख्या | मंजुर नुकसान भरपाईची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | सोयाबीन | ४ | ३१७६६ |
| २ | इतर पिके | १४ | ४५७४९ |
| | एकूण | १८ | ७७५१५ |

(३) सन २०२० या वर्षात शासन निर्णयानुसार पिक नुकसानी, पशुधन करीता शेतकऱ्यांच्या प्राप्त अर्जापैकी निकष पुर्ण केलेल्या शेतकऱ्यांना वनविभागाकडून नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

(४) लागू नाही.

---

**सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील महसूल विभागात अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(३) ४९८३६ (२०-०१-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील महसूल विभागात अनेक पदे रिक्त असल्यामुळे उपलब्ध कर्मचा-यांवर कामाचा अतिरिक्त भार पडत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचा-यांच्या कमतरतेमुळे सर्वसामान्यांची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०७-२०२३) :** (१), (२) व (३) सुधागड तालुक्यातील माहे सप्टेंबर, २०२२ अखेर महसूल सहायक-३, तलाठी-८, शिपाई-३ व कोतवाल-७ ही पदे रिक्त असून प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी व जनतेची गैरसोय टाळण्यासाठी कार्यरत कर्मचा-यांकडे रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

राज्य शासनाच्या ७५ हजार पदे भरती मोहिमेअंतर्गत उप जिल्हाधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, लघुलेखक निम्नश्रेणी, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, महसूल सहाय्यक व तलाठी संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने, थेट भरतीव्दारे आणि पदोन्नतीने भरण्याची प्रक्रीया सुरु आहे. त्याअन्वये, जिल्हाधिकारी, रायगड अधिनस्त कार्यालयातील तलाठी व महसूल सहायक संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे, सातारा, सांगली या पश्चिम महाराष्ट्रातील दळणवळणाच्या दृष्टीने भूसंपादनाची कार्यवाही करण्याबाबत**

**(४) ५००७१ (२४-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे, सातारा, सांगली या पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्याच्या दळणवळणाच्या दृष्टीने महत्वाचा असा पुणे-बंगळूर ग्रीनफिल्ड महामार्गासाठी भूसंपादनाची कार्यवाही माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, ग्रीनफिल्ड महामार्गाच्या भूसंपादनाची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करुन प्रकल्पबाधितांच्या समस्या सोडविण्यासाठी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) पुणे - बंगळूर ग्रीनफिल्ड महामार्गासाठी पुणे जिल्ह्यातील भोर या तालुक्यातील D.P.R. प्रक्रिया सुरु करण्यात आली असून त्याअंतर्गत भोर तालुक्यातील एकूण २२ गावांकरिता उप विभागीय अधिकारी, भोर यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.फलटण, माण - खटाव व कोरेगाव येथील भूसंपादनासाठी उपविभागीय अधिकारी, माण - खटाव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतु सदर क्षेत्राकरिता भूसंपादन संस्थेकडून भूसंपादन प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत. सांगली जिल्ह्यातील खानापूर - विटा, तासगाव व मिरज या तालुक्यातील D.P.R. प्रक्रिया सुरु करण्यात आली असून त्याअंतर्गत मिरज व खानापूर विटा तालुक्यातील १२ गावांसाठी उप विभागीय अधिकारी खानापूर - विटा यांची सक्षम अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
सदर प्रकल्पाकरिता प्रकल्पबाधितां कडून कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) व वाडा (जि.पालघर) येथील शेतकऱ्यांच्या विविध योजनांमध्ये होत असलेला गैरव्यवहार**

**(५) ५०७४१ (१९-०१-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) व वाडा (जि.पालघर) येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालयास शासनाने सन २०१९-२० ते आजपर्यंत शेतकऱ्यांच्या विविध योजना राबविण्याकरीता करोडो रुपयांचा निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्यांचे कृषी अधिकारी हे लोकप्रतिनिधी यांना शासकीय योजना राबविताना कोणतीही माहिती देत नसून सदर योजनेच्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोन तालुका कृषी अधिकारी यांनी तीन वर्षांमध्ये राबविलेल्या योजनांसंदर्भातील चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०३-०७-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) यांच्या प्रशासकीय कामकाजातील अनियमितता व गैरव्यवहाराबाबत**

**(६) ५११९७ (२७-०१-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील वन विभागांतर्गत, उपवनसंरक्षक, सहाय्यक उपवनसंरक्षक, तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) व त्यांच्या नियंत्रण व कार्यक्षेत्रांतर्गत गिरडा बीट क्र.१ मधील सागवन वृक्षांची अवैध वृक्षतोड व त्यांच्या प्रशासकीय कामकाजातील अनियमितता व गैरव्यवहाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या तक्रारीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०७-२०२३) :** (१) गिरडा बिट क्र.१ मधील सागवान वृक्षांची अवैध वृक्षतोड व त्यांच्या प्रशासकीय कामकाजातील अनियमितता व गैरव्यवहाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांची दि.२०.०७.२०२२ रोजीची तक्रार उपवनसंरक्षक, बुलडाणा कार्यालयास प्राप्त झाली आहे.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक वनसंरक्षक (प्रा.व कॅम्पा) बुलडाणा यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली. चौकशी अहवालानुसार वनरक्षक गिरडा हे दोषी आढळल्यामुळे त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत दोषारोपपत्र बजाविण्यात आले आहे.
सदर प्रकरणामध्ये अंतिम चौकशी अहवालात वनरक्षक गिरडा हे शासकीय कामात निष्काळजीपणा करुन वन संपदेच्या नुकसानीस कारणीभुत ठरल्याने त्यांना देय असलेली दि.०१.०७.२०२३ रोजीची वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात रोखण्यात येत असल्याचे अंतिम आदेश दि.१६.०२.२०२३ रोजी पारित करण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी तालुक्यात तहसील कार्यालय व तलाठी सजा उभारण्याबाबत**

**(७) ५१३३९ (२७-०१-२०२३). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी तालुक्यात तहसील कार्यालयाचे पुर्ननिर्माण तसेच ३० नवीन तलाठी सजा उभारण्यासाठी स्थानिक लोकप्रतीनिधींनी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य व महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन देऊन निधी उपलब्ध करण्याची मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत महसूल मंत्री यांनी अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग महाराष्ट्र राज्य यांना प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) भिवंडी तालुक्यातील ३० तलाठी कार्यालयाच्या इमारतीचे बांधकामाच्या प्रस्तावास दि.२७/०६/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यात डिजिटल सात-बारा उतारे मिळण्यास होणाऱ्या विलंबाबाबत

**(८) ५१५५४ (२७-०१-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाने पीक कर्ज, पीक विमा तसेच शेती संबंधी इतर वेगवेगळ्या सरकारी योजनांचा वापर करण्याकरीता शेतीचा सात-बारा डिजिटल उतारा सहीने देण्याची घोषणा केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने घोषणा करुनही सहा वर्षे उलटूनही डिजिटल उतारे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात एकुण १२ लाख ६ हजार ५२२ सात-बारा उतारे असून त्यापैकी ११ लाख ८६ हजार २५४ उतारे डिजिटल झाले आहेत त्यापैकी १९ हजार ५५७ उतारे अद्यापही सही झाली नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सर्वसामान्य नागरीक व शेतकऱ्यांचा वेळ वाचावा तसेच शेतीचे अचूक सात-बारा उतारे वेळेत मिळावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
शासन परिपत्रक दिनांक ११/७/२०१७ अन्वये हस्तलिखीत ७/१२ उताऱ्यांचे वितरण दिनांक ३१/७/२०१७ पासून पूर्णत: बंद करून ऑनलाईन फेरफार घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.त्यानुसार शासनाने महाभूमी या संकेतस्थळावर गांव नमूना नं. ७/१२, ८ अ व ६ चे उतारे डिजीटल स्वरूपात उपलब्ध केलेले आहेत. तसेच शासन परिपत्रक दिनांक २३/११/२०२० अन्वये डिजीटल स्वाक्षरीत डेटा बेस आधारित संगणकीकृत अधिकार अभिलेखास (गांव नमूना नं. ७/१२, ८ अ व ६) कायदेशिर वैधता देण्यासंदर्भात दिशा निर्देश देण्यात आलेले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) माहे मे-२०२२ अखेर सोलापूर जिल्ह्यातील एकूण १९,५५७ इतके उतारे डिजिटल सहीकरिता प्रलंबित होते. सदरचे उतारे हे NLRMP अंतर्गत हस्तलिखित ७/१२ गटाचे व खातेदार यांचे क्षेत्र तसेच Online Data Correction अहवालामध्ये विसंगती असल्याने प्रलंबित दिसून आले होते. ७/१२ उतारे डिजिटल साईन करणेची प्रक्रिया तलाठी यांचे स्तरावर निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. तसेच, याबाबत प्रलंबित डिजिटल स्वाक्षरीत डेटाबेस अहवालाबाबत दर आठवड्याच्या शुक्रवारी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्यामार्फत (vc द्वारे) सर्व संबंधितांकडून साप्ताहिक आढावा घेण्यात येतो व Online Data Correction मधील त्रुटी दूर करून ७/१२ डिजिटल स्वरूपात नागरिकांना Online उपलब्ध करून देण्याची दक्षता घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यात ७/१२ ऑनलाइन करतेवेळी चुका झाल्याबाबत

**(९) ५१९६० (२७-०१-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यात कर्मचाऱ्यांच्या चुकीमुळे ७/१२ ऑनलाइन करतेवेळी चूका झाल्या असून

यामध्ये शेतकऱ्यांची काहीही चूक नसताना त्यांना तहसील कार्यालयात वांरवार जावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऑनलाईन ७/१२ च्या नोंदी घेताना झालेल्या चुकीमुळे सन २०२१ या कालावधीपासून आतापर्यंत २१० प्रकरणे दाखल असून त्याचा निकाल प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरील प्रकरणे तातडीने निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
ऑनलाईन ७/१२ च्या नोंदी घेतांना झालेल्या चुकीमुळे सन २०२१ पासुन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १५५ अंतर्गत दुरुस्तीकरीता २१० प्रकरणे दाखल झाले असुन या सर्व प्रकरणामध्ये आदेश पारीत करण्यात आलेले आहे. या बाबतीत आज रोजी प्रलंबित प्रकरणे निरंक आहे. तसेच, ऑनलाईन ७/१२ दुरूस्तीबाबत नियमित कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात प्रॉपर्टी कार्डचा प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित असल्याबाबत**

**(१०) ५२१४७ (२९-०१-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गृह प्रकल्पातील प्रत्येक सदनिकाधारकाला प्रॉपर्टी कार्ड देण्याबाबत भूमी अभिलेख विभागाने तयार केलेला प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्ताव भुमी अभिलेख विभागाने विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविला असता त्यांनी सदरहू प्रस्तावात त्रुटी काढल्या आहेत , हे ही खरे आहे काय,
३) असल्यास, उक्त प्रस्तावात सुधारणा करुन अंतिम नियमावली मान्यतेसाठी पाठविली असता अद्यापही प्रस्ताव प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने प्रॉपर्टी कार्ड देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) महाराष्ट्र जमीन महसूल सदनिकांचे अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थीतीत ठेवणे) नियम २०१९ बाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभागास सादर करण्यात आला होता. सदर नियम विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार अंतीम करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे .
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चौक (ता.खालापूर, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील वडार समाजाच्या वस्तीचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याबाबत**

**(११) ५२४७२ (२९-०१-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चौक (ता.खालापूर, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नं. २७ मिळकतीत राहत असणा-या वडार समाजाच्या

वस्तीचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त समाजाच्या पुनर्वसनाच्या मागणीनुसार सन २०१७ या कालावधीत सर्व्हे नं. २७ मधील जागा देण्याबाबत ग्रामपंचायतीने ठरावाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समाजाच्या पुनर्वसनासाठी लागणा-या भूखंडाची शासकीय नियमानुसार आवश्यक ते शुल्क भरण्याची तयारी समाजाने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१) (२) (३) (४) व (५) मौजे चौक ग्रामपंचायत हद्दीतील २१ कुटुंबांना पुनर्वसनासाठी स.नं.२७ मधील जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी रायगड जिल्ह्यातील दोन विधानसभा सदस्यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांना दिनांक ११.११.२०२२ च्या पत्रान्वये केली आहे.

मौजे चौक मानिवली, ता.खालापूर येथील स.नं.२७/१ब, क्षेत्र २२-३४.१० हे.आर या गुरचरण जमिनीमधील प्रत्येकी अर्धा गुंठा याप्रमाणे एकूण ०-११.०० हे.आर क्षेत्र वडार समाजाच्या नागरिकांनी मागणी केली आहे. सदर जमिनीवर उक्त वडार समाजाचे २१ लोकांचे साधारणत: ३०-३५ वर्षापासून घरासाठी अतिक्रमण केले आहे. ग्रामपंचायत, चौक यांनी दिनांक ११.०५.२०१७ अन्व्ये सर्व्हे नं.२७ मधील जागा संबंधितांना देण्याबाबत ठराव पारित केला आहे.

शासन निर्णय दिनांक १२.०७.२०११ नुसार गायरान जमिनीवर गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापरातील जमीन कोणतीही व्यक्ती, खाजगी संस्था संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी मंजूर करता येणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे.

तसेच गायरान जमिनीवरील अतिक्रमणाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.०२/२०२२ दाखल करण्यात आली असून सदर याचिका सुनावणीवर प्रलंबित आहे. सदर जनहित याचिकेमध्ये होणाऱ्या अंतिम आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

## सुधागड (जि.रायगड) येथील पाली बल्लाळेश्वर मंदिर व गावाकडे जाणाऱ्या रस्त्याची भुसंपादन प्रक्रीया प्रलंबित असल्याबाबत

**(१२) ५२५३१ (२९-०१-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुधागड, पाली (जि.रायगड ) येथील बल्लाळेश्वर मंदिर व गावाकडे जाणाऱ्या बाहय वळण रस्त्याची भुसंपादन प्रक्रीया पुर्ण झालेली नाही ,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविक व स्थानिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रक्रिया जलदगतीने पुर्ण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी , २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले ,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भुसंपादन प्रक्रियेस होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच लवकरात लवकर भुसंपादन प्रक्रिया पार पाडून बाहय वळण रस्ता करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१), (२) व (३) रायगड जिल्ह्यातील ता. सुधागड येथील पाली गाव व बल्लाळेश्वर मंदिराकडे जाण्यासाठी असलेल्या बाहय वळण रस्त्याची भुसंपादन प्रक्रीया
लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत अशा आशयाचे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि. ०१.०२.२०२३ रोजी लेखी निवेदन शासनास दिले आहे.

(४) व (५) संपादन आराखड्यानुसार संयुक्त मोजणीवेळी काही शेतकऱ्यांनी हरकत घेतल्यामुळे, तसेच रस्त्याच्या आराखड्याबाबत शेतकऱ्यांमध्ये एकमत होत नसल्यामुळे मोजणी वेळेत पुर्ण होऊ शकलेली नाही.
तथापि, बाधीत शेतकऱ्यांच्या वेळोवेळी बैठका घेऊन रस्त्याच्या आराखड्याबाबत सहमती घडवुन आणली आहे.
आता, भूसंपादनाची प्रक्रिया जलद पुर्ण करण्याचे नियोजन क्षेत्रीय यंत्रणेने केलेले आहे.

---

**मुंबई-अहमदाबाद प्रस्तावित हायस्पीड 'बुलेट ट्रेन' साठी ठाणे जिल्हयातील ७९.८७ हेक्टर जमिनीपैकी सुमारे ७५.५१ हेक्टर जमिनीचे झालेल्या भूसंपादनाबाबत**

**(१३) ५२९८८ (२९-०१-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-अहमदाबाद दरम्यान धावणाऱ्या 'बुलेट ट्रेन' प्रवासासाठी ठाणे जिल्हयातील ७९.८७ हेक्टर जमिनीपैकी सुमारे ७५.५१ हेक्टर जमिनीचे भूसंपादन पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापैकी किती जमिन रेल्वे विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली तसेच किती कालावधीत संपादित केली जाणार आहे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१) मुंबई -अहमदाबाद हायस्पीड रेल्वे मार्ग (बुलेट ट्रेन) करिता ठाणे जिल्हयातील ३४.०२ हे. आर. क्षेत्र खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्यात आले आहे. व ४५.२४ हे. आर. क्षेत्र भुमी संपादन, पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये संपादित करण्यात आली आहे.
असे एकुण ठाणे जिल्हयातील ७९.२६ हे. आर. क्षेत्र संपादीत करण्यात आले आहे.
(२) व (३) मुंबई- अहमदाबाद हायस्पीड रेल्वे मार्ग (बुलेट ट्रेन) करिता ठाणे जिल्हयातील एकुण ७९.२६ हे.आर. संपादीत क्षेत्रापैकी ७३.०९ हे. आर. क्षेत्राचा ताबा रेल्वे विभागाकडे (NHSRCL) देण्यात आलेला आहे. उर्वरित क्षेत्राचा ताबा देण्याची कार्यवाही भूसंपादन अधिकारी, ठाणे, कल्याण व भिवंडी कार्यालयामार्फत सुरू आहे.

---

**बुलढाणा येथे कृषी महाविद्यालय सुरु करण्याबाबत**

**(१४) ५३२८५ (२४-०१-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत बुलढाणा येथे शासकीय कृषि महाविद्यालय स्थापन करण्याबाबत महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेने ठराव क्र.०६/९६/२०१८ संमत करुन प्रस्ताव मान्य करण्याबाबत शासनास शिफारश केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने बुलढाणा येथे कृषि महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास सादर केला असता, डॉ.एस.एस.मगर समितीने तयार केलेला कृषि शिक्षणाचा बृहत आराखडा अंतिम झाल्याशिवाय नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव सादर करण्यात येऊ नये, असे अभिप्राय वित्त विभागाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत कृषि शिक्षणाचा बृहत आराखडा अंतिम करण्यात आला असून कृषि महाविद्यालयाचा सदर बृहत आराखड्यात समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कृषी महाविद्यालयास मान्यता देऊन स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०६-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) कृषि शिक्षणाचा बृहत आराखडा शासनस्तरावर विचाराधीन असून अद्याप अंतिम झालेला नाही.
(४) बुलढाणा येथे शासकीय कृषि महाविद्यालय स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) तालुक्यातील मंडळ अधिकारी कार्यालयाच्या इमारत बांधकामासाठी मंजूरी देऊन निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(१५) ५३६४७ (२९-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील मंडळ अधिकारी कार्यालयाच्या इमारत बांधकामासाठी मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनीं महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ५ नोव्हेबंर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील कार्यालयाच्या इमारत बांधकामासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) भोर (जि. पुणे) तालुक्यातील ४० तलाठी व ०५ मंडळ अधिकारी कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी रुपये १०००.०० लक्ष इतक्या रकमेचा प्रस्ताव आहे. कामाची निकड व निधीची उपलब्धता विचारात घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याची बाब कार्यवाहीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे म्हसरुळ ( ता.जि.नाशिक) येथील उप अधिक्षक भूमीअभिलेख कार्यालयातील कामाच्या अनियमितेतबाबत**

**(१६) ५३८७३ (२९-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे म्हसरुळ (ता.जि.नाशिक) येथील सि. स. नं. १६३/४ व मौजे गंगाव येथील गट नं. ४३/३ मोरन. ४३८५ या भूमापन नंबरच्या हद्द कायम मोजणीकामात उपअधिक्षक भूमी अभिलेख नाशिक यांच्याकडून मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याने संबंधित शेतकरी यांनी मा.आयुक्त जमाबंदी पुणे यांच्याकडे दिनांक ५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास व जिल्हा अधिक्षक यांच्याकडे दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे तक्रार केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उप अधिक्षक भूमीअभिलेख नाशिक यांच्याकडून मोजणी प्रकरणे गहाळ करणे, हद्द कायम न करताच 'क' नकाशा तयार करणे व बांधकाम व्यावसायिक यांच्या लाभात काम करणे अशा विषयी तक्रारी आयुक्त जमाबंदी पुणे यांच्याकडे करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०७-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे. मौजे गंगाव ता. जि. नाशिक येथील स.नं. २६ चे मोजणी संदर्भात दिनांक ६.१२.२०१९ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे. तसेच, सर्व्हे नंबर ४३/३ मो.र.नं. ८३४५/२०२० प्रकरणी दिनांक ३१/०३/२०२१ रोजी लगत कब्जेदार श्री. अरूण रामनाथ निकम यांचा हरकत अर्ज उप अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक कार्यालयात प्राप्त आहे. सदर प्रकरणी अनियमितता झालेली नाही.

मौजे म्हसरुळ ता.जि.नाशिक येथील सि.स.नं. १६३/४ चे मोजणी संदर्भात तक्रार अर्ज प्राप्त झालेला नाही. तथापि, हद्द कायम मोजणी प्रकरण दाखल केले त्यानुसार हद्द कायम मोजणी र. नं. ८१७८/२०२० मोजणी काम करण्यात आले. परंतु अर्जदार यांनी दि.२९/१०/२०२० रोजी विनाकार्यवाही निकाली करण्याबाबत जबाब दिल्याने त्याप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात आले.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्हयातील भुकंपग्रस्त भागातील मोजणीच्या प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्याबाबत

**(१७) ५४३५८ (२९-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हयातील भुकंपग्रस्त अ व ब वर्गवारीच्या गावातील जमीन मोजणीची, शेतरस्ता, गावठाण, संपादित जमीन व घरांची मोजणीची मोठ्या प्रमाणात प्रकरणे प्रलंबित असल्याने सदरील जमीनीच्या मोजणीसाठी स्वतंत्र अधिक्षक भुमी अभिलेख व दोन मोजणीदार नियुक्त करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भुकंपग्रस्त भागातील मागील २९ वर्षापासून प्रलंबित असलेली भुसंपादन व पुनर्वसन अंतर्गत संपादित जमीन व वाटप केलेल्या घरांची, जुन्या गावठाण व शेत रस्त्याची मोजणीची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी व भुकंपग्रस्त भागातील मोजणी न झाल्यामुळे व सिमांकन न केल्यामुळे भांडण तंटे निर्माण होतआहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार सदरील मागणीच्या अनुषंगाने स्वतंत्र अधिकारी व मोजणीदार नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०७-२०२३) :** (१) सन्मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त झाले आहे हे खरे आहे.
(२) उप अधीक्षक भूमी अभिलेख, औसा यांचे कार्यालयाकडून भुकंपग्रस्त अ व ब वर्गाच्या संपादित गावाच्या गांवठाण हद्द कायमसाठी प्राप्त झालेल्या ४८ गावांपैकी ४० गावांच्या गावठाणाची हद्द कायम करण्यात आलेली आहे. उर्वरित ८ गावांचे मोजणी व हद्द कायम करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

एकूण ५८२ पैकी ४२१ शेत रस्ते मोजणी करण्यात आले आहेत. उर्वरीत १६१ शेतरस्त्याचे शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे तहसिलदार, औसा कार्यालयाकडून निश्चित केलेल्या मंडळनिहाय नियोजनाप्रमाणे निश्चित तारखेस शेत रस्ते मोजणीची कार्यवाही करणेची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच, औसा तालुका भूमी अभिलेख कार्यालयात भूकंपग्रस्त पूनर्वसन गावातील अंतर्गत मंजूर रेखांकनाप्रमाणे भूखंड /घरांच्या मोजणी कामासाठी प्रकरण प्राप्त नाहीत.
(३) प्रलंबित असलेली तसेच प्रगतीपथावर असलेली कामे ही जिल्हयातील तसेच अन्य तालुक्यातील कर्मचारी यांच्या सेवा वापरून मोजणी काम निकाली काढण्याची तजवीज ठेवली आहे.

---

**कल्याणच्या पुढे मध्य रेल्वेच्या तिस-या व चौथ्या रेल्वे मार्गांसाठी  जमीन संपादित करण्याबाबत**

**(१८) ५४६२० (२९-०१-२०२३). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याणच्या पुढे रेल्वेने तिस-या व चौथ्या रेल्वे मार्गांसाठी शेतक-यांची जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबरनाथ तालुक्यातील शेतक-यांना अद्याप मोबदला मिळाला नसल्याने शेतक-यांनी आक्रमक होण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प अर्थात एमयुटीपी प्रकल्पांतर्गत बांधित शेतक-यांना शासनाच्या नियमाप्रमाणे मोबदला देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१) कल्याण ते बदलापूर मध्य रेल्वे मुंबई विभागातील तिस-या व चौथ्या रेल्वे मार्गासाठी मुंबई विकास रेल्वे कॉर्पोरेशन लि. या संपादन संस्थेकडुन रेल्वे अधिनियम २००८ (सुधारित) मधील तरतुदीनुसार मौजे को. खुटवली, कात्रप, कुळगांव, बेलवली, मोरीवली व चिखलोली येथील संयुक्त मोजणी प्रक्रिया पूर्ण झाली असून कलम २० ई प्रमाणे सदर संपादन प्रकल्पाबाबतची अधिसूचना स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे.

उपविभागीय अधिकारी उल्हासनगर कार्यालयाकडून संपादित क्षेत्राचा निवाडा दिनांक २८/०१/२०२२ रोजी घोषित करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अशी बाब नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर भूमापन विभागात पीआर कार्ड व नावाची नोंद घेणे यासह पोट विभाजनाच्या संचिता विनावापरात पडून असल्याबाबत**

**(१९) ५४८०३ (२९-०१-२०२३). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर भूमापन विभागात पीआर कार्ड व नावाची नोंद घेणे यासह पोट विभाजनाच्या तब्बल दिड हजार संचिता विनावापरात पडले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अर्ज काही वर्षे उलटूनही त्यात नेमक्या कोणत्या त्रुटया आहेत वा कागदपत्रे अपूर्ण असल्याचे संबधित अर्जदारास अधिकारी–कर्मचा-यांकडून काहीच सांगण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) यासंदर्भात वर्तमानपत्रात आलेल्या बातमीच्या अनुषंगाने प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उप अधीक्षक भूमि अभिलेख, वैजापूर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. राज्यात दिनांक १/४/२०२१

पासून हस्तलिखीत फेरफार प्रणाली कायमची बंद करून ऑनलाईन फेरफार प्रणाली लागू करण्यात आली आहे. भूमि अभिलेख विभागामध्ये फेरफाराकामी प्राप्त अर्ज आज्ञावलीमध्ये नोंदवून ती मंजूर करणे आवश्यक आहे.

नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद कार्यालयातील कर्मचारी यांना वेळोवेळी प्रलंबित प्रकरणे निकाली करणे कामी सदर नव्याने वापरात आणलेल्या आज्ञावलीचे प्रशिक्षण, मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या आहेत, त्याअन्वये नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे कार्यवाही चालू आहे. नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे नामांतरण अर्जाचा ओघ हा जास्त असल्यामुळे तसेच कार्यालयातील कर्मचारी यांना सदर आज्ञावली नवीन असल्यामुळे नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे एकच अर्ज सदर आज्ञावलीमध्ये अपूर्ण भरणे / दुबार भरणे / सदोष भरणे अशी कार्यवाही झाली आहे, नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांना व त्यांचे कार्यालयातील कर्मचारी यांना वेळोवेळी मार्गदर्शन/सुचना/आदेश देऊन सदर आज्ञावलीमधील दुबार झालेले / अपूर्ण भरलेले/सदोष भरलेले / निकाली फेरफार प्रकरणात निकाली पत्र निर्गमीत करुन प्रलंबीत तसेच नियमीत फेरफार अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. प्राप्त फेरफार अर्जांमध्ये विवादग्रस्त प्रकरणांचाही समावेश असल्याने कार्यवाहीस विलंब होत आहे. सदरचे फेरफार प्राथम्याने निकाली काढण्याची दक्षता घेणे बाबत सूचना दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रेणापूर (जि.लातूर) येथे विविध कार्यकारी सेवा सहकारी या संस्थेच्यावतीने कर्जमाफीपासून वंचीत असल्याने शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याबाबत

**(२०) ५४९६१ (२७-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेणापूर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, जि.लातूर या संस्थेच्यावतीने पिक कर्ज घेतलेले शेतकरी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ च्या कर्जमाफीपासून वंचीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे सप्टेंबर-आक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (११-०७-२०२३) :** (१) व (२) होय.
(३) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेअंतर्गत एकुण ४४.०४ लाख कर्जखात्यांना रु.१८,७६२ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच सदर योजनेंतर्गत पात्र असलेल्या उर्वरीत कर्जखात्यांना लाभ देण्यासाठी, सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात रु. ५५.७६ कोटी इतक्या रकमेची तरतुद करण्यात आली असुन त्याअनुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहू नयेत यासाठी सिबिल स्कोअरची अट रद्द करण्याबाबत

**(२१) ५६६३९ (१३-०४-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पिक पेरणीसाठी कर्ज घेताना रिझर्व बँकेच्या नवीन धोरणानुसार राष्ट्रीयकृत बँकानी शेतकऱ्यांचे सिबील स्कोअर तपासणी करताना पाहू नये, असे शासनाचे आदेश असतानाही त्याकडे दुर्लक्ष करुन शेतकऱ्यांना पिक कर्ज देत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पिक हंगामासाठी शेतकऱ्यांना पैशाची गरज असते, परंतु व्यापारी व राष्ट्रीय कृत बँका सिबील स्कोअर ६०० ते ७०० पर्यंत असल्याशिवाय पिक कर्जाचे वितरण करीत नसल्यामुळे शेतकऱ्यांना पिक कर्ज मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या जाचक अटीमुळे हजारो शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहू नयेत यासाठी सिबिल स्कोअरची अट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०४-०७-२०२३) :**(१) नाही.
(२) व (३) नाही.
(४) राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या दि.१७.०३.२०२३ रोजीच्या सभेमध्ये पीक कर्ज मंजूरीचा निर्णय घेताना सिबिल स्कोअरचा अवलंब न करता केवळ कर्ज छाननी वेळेस कर्जदाराची पात्रता तपासताना सिबिल स्कोअरचा वापर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत राज्यस्तरीय बँकर्स समितीकडे दि.२५.०५.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयास कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंप्राळा महसूल मंडळ (जि.जळगाव) येथील सोयाबीनच्या नुकसान भरपाईपोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये अत्यल्प रकमा टाकून शासनाची फसवणूक केल्याबाबत**

**(२२) ५६९३९ (१९-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंप्राळा महसूल मंडळ (जि.जळगाव) येथील तीन शेतकऱ्यांना खरीप सोयाबीनच्या नुकसान भरपाईपोटी अनुक्रमे रुपये १५,६७५, रुपये ५४० रकमा मिळाल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सोयाबीनच्या नुकसान भरपाईपोटी हेक्टरी ३८ हजार रुपयांची नुकसान भरपाई निश्चित असतांनाही शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये अत्यल्प रकमा टाकून शेतकऱ्यांची व शासनाची फसवणूक करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, तद्नुसार संबंधित पिक विमा कंपनी व अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई केली तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईच्या देय रकमा अदा करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०३-०७-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
प्रधानमंत्री पीक विमा योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात राबविण्यात येत आहे. सदर मार्गदर्शक सुचनांनुसार पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम अत्यंत कमी प्रमाणात येत असल्यास शासन निर्णय दिनांक ३१ मे, २०१९ नुसार वैयक्तिक शेतकऱ्यास विमा योजनेंतर्गत सर्व अर्ज मिळून हंगामाच्या शेवटी किमान नुकसान भरपाई रुपये १०००/- देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) पिंप्राळा (ता. जळगाव) या महसूल मंडळातील सोयाबीन पिकाकरीता २३६ शेतकरी अर्जदारांनी सहभाग घेऊन २७३.५९ हे. विमा क्षेत्र संरक्षित केले होते. त्यापैकी ७६ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. ४.४२ लाख निश्चित करुन वाटप करण्यात आले आहे.

तसेच, या महसूल मंडळातील सर्व अधिसुचित पिकांकरीता १०३१ शेतकरी अर्जदारांनी सहभाग घेऊन १०३४ हे. विमा क्षेत्र संरक्षित केले होते. त्यापैकी ३२४ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. १९.४४ लाख निश्चित करुन वाटप करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, उत्पादनावर आधारीत नुकसान भरपाई परिगणनेची कार्यवाही सुरु आहे
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कानळदा व फुपनगरी (ता.जळगांव) येथील पोटखराबा जमीन क्षेत्राचे प्रस्ताव तहसिल कार्यालयामध्येच पडून असल्याबाबत

**(२३) ५७२८६ (२१-०४-२०२३). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोटखराबा हा प्रकार ब्रिटिश काळात ७/१२ उताऱ्यावर आणला गेला यास्तव जमीन क्षेत्र कमी झाल्यामुळे सदर जमीन वहिवाटीसाठी आणण्याचे आदेश शासनाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोटखराबा हे क्षेत्र वहिवाटीखाली आणण्यासंबंधीचे शेकडो प्रस्ताव अद्याप तहसिल कार्यालयातच पडून असल्यामुळे जळगांव, चोपडा, धरणगांव, यावल व जामनेर तालुक्यासह अन्य सर्वच भागात १० टक्केच प्रस्ताव मार्गी लागल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मौजे कानळदा व फुपनगरी (ता.जळगांव) येथील शेतकऱ्यांनी पाठपुरावा करुनही तलाठयांनी तयार केलेले प्रस्ताव प्रशासकीय कारणामुळे तसेच उक्त प्रस्ताव मंजुरीची प्रक्रिया ही लांबलचक (Lengthy) व क्लिष्ट स्वरुपाची असल्याने त्या त्या तहसिल कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडेच प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यासाठी कार्यालयात वारंवार जावे लागत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने जाणीवपूर्वक प्रस्ताव प्रलंबित ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) बाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि.१९.०८.२०१९ च्या परिपत्रकान्वये पोटखराबा वर्ग अ मधील क्षेत्र जमीन धारकाने लागवडीखाली आणल्यास त्यास लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात अतिरिक्त आकारणी करण्याबाबतची कार्यवाही विहित केलेली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांच्या दि.०७.०९.२०१९ च्या आदेशान्वये महसूली गावातील जमीन धारकाने वर्ग अ खाली येणारी जमीन कोणत्याही लागवडीखाली आणल्यास त्याकरिता अतिरिक्त आकारणी करण्याकरिता महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम १९६८ व सुधारणा नियम, २०१८ नुसार असलेले अधिकार उपविभागीय अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्राकरीता प्रदान करण्यात आले आहे.

पोटखराबासंदर्भातील प्रकरणामध्ये महसूल विभाग व भूमि अभिलेख विभाग यांच्या समन्वयाने तपासणी करण्यात आल्यानंतर, प्रकरणामध्ये उपविभागीय अधिकारी यांच्या स्तरावर निर्णय घेण्यात येतो. तसेच प्रलंबित असलेले प्रस्ताव मार्गी लावण्यासाठी महसूल विभाग व भूमि अभिलेख विभागामार्फत कालबद्ध कार्यक्रम ठरवून त्यानुसार विभागामार्फत नियमितपणे आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात व पोटखराबा क्षेत्राबाबतचा पाठपुरावा दरमहा होणाऱ्या महसूल अधिकारी यांच्या सभेत घेण्यात येतो.

(४) अशी बाब नाही.

(५) अशी बाब नाही.

---

**औरंगाबाद येथील मालमत्ता फेरफार प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(२४) ५७३३१ (२१-०४-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील मालमत्ता फेरफाराच्या प्रलंबित प्रस्तावांची दिवसेंदिवस संख्या वाढत असतांना अनेक प्रकरणांत तलाठी आक्षेप, न्यायालयीन वाद नसतांनाही मालमत्तांचे फेर घेण्यास तलाठी वा तहसिल कार्यालयात अधिक कालावधी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम व्यावसायिक वा अन्य नेते मंडळीचे त्याबाबतचे प्रस्ताव आल्यास मात्र त्यावर तातडीने प्रक्रिया करुन फेर प्रस्ताव मंजुर केल्याचे प्रकार तेथील महसूल तलाठी कार्यालयात सुरु असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील तलाठी कार्यालयात विकासकांनी दिलेल्या घोषणापत्राच्या आधारावर तेथील तलाठी (श्री.काशिद) यांनी, सातबारामध्ये त्या जागेत तयार होणाऱ्या बांधकाम परिसरातील रो-हाऊस, फ्लॅट, दुकानांचे फेर सातबारा उता-यांमध्ये नोंद केल्याचे निदर्शनास आले तथापि नियमानुसार बांधकाम पुर्ण झाल्यानंतर व महापालिकेने बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र अथवा खरेदी विभागांच्या व्यवहारानंतर अशी नोंद करणे बंधनकारक आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नियमबाह्य नोंदी केल्याप्रकरणी कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) अपर तहसिलदार औरंगाबाद यांच्या अहवालानुसार औरंगाबाद महसुल मंडळांतर्गत तलाठी सजा औरंगाबाद, हर्सुल व गांधेली या गावांमध्ये फेरफार नोंदी तपासणी केली असता, मौजे हर्सुल ता. जि. औरंगाबाद येथील सर्वे नंबर ८१ मध्ये फेरफार क्रमांक ३३४९९ अन्वये भाग्योदय बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार नं. १ वर्धमान राजमल ललवाणी, २. निलेश मनहरलाल बाबरीया यांनी विनंती अर्ज, घोषणापत्र, अकृषीक आदेश ८, बांधकाम परवाना, रेखांकन मंजुरी आदेश सादर केल्यावरुन सर्वे नंबर ८१ मध्ये क्षेत्र ६०००.०० चौ.मी. करीता घोषणापत्रावरुन नोंद घेण्यात आली. सदर फेरफार संबंधित संचिकेतील कागदपत्रे अपूर्ण असल्याने सदर फेर नोंद दिनांक १४.१२.२०२२ रोजी त्रुटीची दुरुस्ती करीता तलाठी स्तरावर पुर्तता करण्यासाठी परत पाठविण्यात आली. त्रुटीची पुर्तता न झाल्याने सदर नोंद दिनांक १६.०१.२०२३ रोजी मंडळ अधिकारी स्तरावर नामंजुर करण्यात आलेली आहे.

(४) सदर प्रकरणी मंडळ अधिकारी औरंगाबाद यांचे स्तरावरुन फेरफार नोंद नामंजुर करण्यात आलेली असल्याने प्रकरणात कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महसूल प्रशासनात अत्यंत कमी मानधनावर २४ तास शासन सेवेत बांधील असणाऱ्या कोतवाल संवर्गाकरिता चतुर्थ श्रेणी विचाराधिन ठेवून सद्यस्थितीत किमान वेतन दर्जा लागू करणेबाबत**

**(२५) ५७४५६ (२१-०४-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.जयकुमार गोरे (माण), अॅड.राहूल कुल (दौंड), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव**

**(भायखळा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने आकृतीबंधानुसार कोतवाल पदे परीक्षाद्वारे भरली असून सदरील कोतवाल हे मानधनावर कार्यरत असल्याने व ते पूर्णवेळ काम करीत असल्याने सदरील कोतवाल संघटनेनी राज्यातील कोतवाल पदे कायम सेवेत सामाऊन घेऊन त्यांना महसुली गट ड व गट क पदामध्ये आरक्षण देण्याबाबत महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटनेने आपल्या विविध मागण्यांसाठी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल प्रशासनात अत्यंत कमी मानधनावर २४ तास शासन सेवेत बांधील असणाऱ्या कोतवाल संवर्गाकरिता चतुर्थ श्रेणी विचाराधिन ठेवून सद्यस्थितीत किमान वेतन दर्जा लागू करा, समान काम समान वेतन धर्तीवर एकसमान १५००० वेतन लागू करा, तलाठी व तत्सम पदांमध्ये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या धरतीवर १० टक्के आरक्षण लागू करा, कोरोना ने मृत्यू झालेल्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर सेवेत सामावून घ्या, सेवानिवृत्त कोतवालांना निर्वाह भत्ता द्या, सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे करण्यात यावे. या प्रमुख मागण्यासह अन्य मागण्या शासनाकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) किमान वेतन अधिनियम, १९४८ मधील तरतूदी नुसार महाराष्ट्र राज्यातील "स्थानिक स्वराज्य संस्थांमधील (ग्रामपंचायत) कामधंदा" या रोजगारात असलेल्या कामगारांना देय असलेले किमान वेतन दर उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन अधिसूचना दि. १०.०८.२०२० अन्वये निर्धारित केलेले आहेत. सदर किमान वेतन दर "स्थानिक स्वराज्य संस्थांमधील (ग्रामपंचायत) कामधंदा" या अनुसूचित उद्योगांमध्ये काम करणारे कामगार / कर्मचारी यांचे करिता लागू आहेत. तथापि, महसूल विभागातील सेवेत कार्यरत असणाऱ्या कोतवाल यासंवर्गास "स्थानिक स्वराज्य संस्थांमधील (ग्रामपंचायत) कामधंदा" या अनुसूचित रोजगारांचे किमान वेतनदर लागू होणार नाहीत या उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या अभिप्राया नुसार कोतवालांना किमान वेतनदर लागू करणे शक्य नाही.

त्याचप्रमाणे कोतवाल हे अवर्गीकृत मानधन तत्वावरील पद असून ते शासकीय सेवेच्या "गट-ड" संवर्गात मोडत नाही. त्यामुळे त्यांना प्रचलित शासन नियमानुसार थेट "गट-क" संवर्गातील तलाठी पदावर राखीव कोटा ठेवणे संयुक्तिक होणार नाही.

सबब, कोतवाल हे अवर्गीकृत मानधन तत्वावरील पद असून ते शासकीय सेवेत मोडत नसल्याने कोतवालांना अनुकंपा धोरण लागू करणे, निर्वाह भत्ता व सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे करण्याची मागणी संयुक्तीक ठरत नाही.

मात्र, कोतवालांच्या एकत्रित कामांचे स्वरुप, त्यांची पूर्णवेळ शासकीय कामाशी बांधीलकी विचारात घेता महसूल व वन विभागाच्या दि.०६/०२/२०१९ शासन निर्णयान्वये कोतवालांना "राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात योजना", "अटल निवृत्तीवेतन योजना" व "महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना" या योजनांचा लाभ त्या त्या योजनांमधील अटींनुसार लागू करुन त्याकरिता योजनांचे हप्ते शासनाकडून भरण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच आता महसूल व वन विभागाच्या दि.०६/०४/२०२३ च्या शासन निर्णयान्वये, कोतवालांच्या मानधनात भरीव वाढ करुन राज्यातील सर्व कोतवालांना सरसकट एकसमान रु.१५ हजार मानधन लागू करण्यात आलेले आहे.

---

## उपजिल्हाधिकारी व अप्पर जिल्हाधिकारी संवर्गातील जेष्ठता सूची प्रसिद्ध न करता पदोन्नतीपासून वंचित ठेवले असल्याबाबत

**(२६) ५७४७८ (२१-०४-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) :**सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उपजिल्हाधिकारी संवर्गासाठी "सेवाप्रवेश, नियमितीकरण व सेवाजेष्ठता" ठरवण्यासाठी सन १९७७ चे नियम लागू आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सेवाप्रवेश नियमामध्ये उपजिल्हाधिकारी संवर्गाची जेष्ठता यादी दरवर्षी प्रसिद्ध करुन अंतिम करणे बंधनकारक असतानाही सन २००४ ते सन २०२२ या कालावधीमधील उपजिल्हाधिकारी संवर्गाची जेष्ठता यादी महसूल विभागाच्या भोंगळ कारभारामुळे प्रसिद्ध करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात उपजिल्हाधिकारी (निवडश्रेणी) यांची १८१ पदे, अप्पर जिल्हाधिकारी यांची ३५ पदे व अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गाची ३७ पदे रिक्त असतांना जाणीवपूर्वक जेष्ठता यादी प्रसिद्ध करण्यास व रिक्त पदावर पदोन्नती देण्यास टाळाटाळ केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, न्यायालयाचे कोणतेही स्थगिती आदेश नसतांना न्यायालयात फक्त प्रकरणे प्रलंबित आहेत या सबबी खाली उपजिल्हाधिकारी ते निवड श्रेणी उपजिल्हाधिकारी ही पदोन्नती जवळपास २०० उपजिल्हाधिकारी यांचा १४ ते १६ वर्ष सेवाकाळ होवूनही रोखली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपजिल्हाधिकारी संवर्गाची जेष्ठता यादी शासन कधीपर्यंत प्रसिध्द करणार आहे तसेच राज्यात क्षेत्रीय स्तरावर 'सेवा हमी कायदा' आणि मंत्रालय स्तरावर मनमानी कारभारामुळे सदर परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) महाराष्ट्र उप जिल्हाधिकारी (सेवाप्रवेश, ज्येष्ठता निश्चित करणे व स्थायीकरण) नियम, १९७७, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.११३६८/२०१९ व इतर प्रकरणी दि.१८.१२.२०१९ व मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण, मुंबई यांनी दि.०६.१०.२०२० अन्वये दिलेल्या न्यायनिर्णयानुसार उप जिल्हाधिकारी संवर्गाची दि.०१.०१.१९९९ ते दि.३१.१२.२००३ या कालावधीची अंतिम सेवा ज्येष्ठतासूची शासन परिपत्रक दि.३१.१२.२०२० अन्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच, शासन परिपत्रक दि.२९.०७.२०२२ अन्वये दि.०१.०१.२००४ ते दि.३१.१२.२००६ या कालावधीची तात्पुरती सेवा ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर सेवाज्येष्ठतेमध्ये उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिका-यांना संवर्ग संख्येनुसार पदोन्नती कोट्यात जो कोटा उपलब्ध झाला आहे त्यानुसार पदांच्या उपलब्धतेनुसार सदर अधिका-यांना नियमित दिनांक देण्यात आलेला आहे. तसेच ज्या अधिकाऱ्यांना कोटा उपलब्ध झालेला नाही, अशा अधिका-यांच्या सेवा या 'अभावित' दर्शविण्यात आल्या आहेत.

शासन परिपत्रक दि.३१.१२.२०२० अन्वये प्रसिद्ध अंतिम ज्येष्ठतासूचीबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र.४९०८/२०२१ व रिट याचिका क्र.२६१२/२०२१ मध्ये दि.१०.०२.२०२१ रोजीच्या न्यायनिर्णयान्वये जैसे-थे (Status-Quo) चे आदेश पारित केले होते. तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने उक्त दोन्ही याचिका दि.१७.०३.२०२१ रोजीच्या आदेशान्वये जैसे-थे (Status-Quo) आदेशासह मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे (T.A.०१/२१) (रिट याचिका क्र.४९०८/२०२१) व (T.A.०२/२१) (रिट याचिका क्र.२६१२/२०२१) वर्ग केल्या होत्या. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.२६.०८.२०२२ रोजी अंतिम आदेश पारित केले आहेत. सदर अंतिम आदेशाविरुद्ध मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे शासनाने रिट याचिका क्र.११६९२/२०२२ व रिट याचिका क्र.११७६२/२०२२ व्यतिरिक्त अपर जिल्हाधिकारी संवर्गातील (सरळसेवा व पदोन्नत) अधिका-यानी ५ याचिका अशा एकुण ७ याचिका दाखल करण्यात आल्या असून सदर यांचिकावर सुनावणी सुरु आहे.

शासन परिपत्रक दि.३१.१२.२०२० अन्वये प्रसिद्ध अंतिम ज्येष्ठतासूचीबाबत मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र.२३६/२०२१ व मूळ अर्ज क्र.२३७/२०२१ दाखल करण्यात आले होते. सदर अर्जावर झालेल्या मा. न्यायधिकरणाने दि.२७.०७.२०२१ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशाद्वारे याचिकांकर्त्यांनी सेवा ज्येष्ठतासूचीला स्थगिती देण्याची केलेली मागणी अमान्य केलेली आहे.सदर आदेशाविरुध्द देखील मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका स्टॅम्प क्र. १५०६६/२०२१ दाखल केली आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल असलेल्या याचिकांमधील न्यायनिर्णयानुसार अपर जिल्हाधिकारी व उप जिल्हाधिकारी संवर्गाची सेवाज्येष्ठता यादी प्रसिद्ध करुन, अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी), अपर जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी), उप जिल्हाधिकारी संवर्गात रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

### ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेने वेतन धारक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा ३० लाखांचा विमा काढल्याबाबत

**(२७) ५७६०९ (१९-०४-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेने वेतन धारक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा ३० लाखांचा विमा काढल्याने त्याचा फायदा जिल्ह्यातील सुमारे २१ हजार ४७१ शिक्षकांना होणार असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेने शिक्षकांचा विमा तसेच शेतकरी खाते धारकांचा विमा सुद्धा ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँक काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०४-०७-२०२३) :**(१) होय.

(२) शिक्षक संघटनांनी बँकेकडे केलेल्या मागणीच्या अनुषंगाने वेतन धारक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे ग्रुप अपघात विमा पॉलिसी काढण्यात आली आहे. तथापि, राज्य शासनाने राज्यातील सर्व शेतकऱ्यांसाठी वैयक्तिक शेतकरी अपघात विमा योजना सुरु केलेली असल्यामुळे, बँकेने शेतकऱ्यांसाठी विमा योजना सुरु केली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे तुर्काबाद खराडी (जि.औरंगाबाद) परिसरातील शेतकऱ्यांनी कागदपत्रांची पूर्तता करुनही महाराष्ट्र बँक पीक कर्ज देत नसल्याबाबत

**(२८) ५८००३ (२२-०४-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तुर्काबाद खराडी (जि.औरंगाबाद) परिसरातील ३५ गावातील शेतकऱ्यांनी कागदपत्रांची पूर्तता करुनही त्यांना महाराष्ट्र बँक पीक कर्ज देत नसल्याचे दिनांक २ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना पीक कर्ज मंजूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (११-०७-२०२३) : (**१) होय.

(२) सन २०२२-२३ या वित्तीय वर्षामध्ये मौजे तुर्काबाद खराडी (जि.औरंगाबाद) शाखेच्या परिसरातील ३५ गावातील एकुण ८८३ शेतकऱ्यांनी महाराष्ट्र बॅंकेत पीक कर्ज मिळणेबाबत अर्ज दाखल केला होता. त्यापैकी कागदपत्रांची पुर्तता केलेल्या ८४७ शेतकऱ्यांना (९६ टक्के) बॅंकेमार्फत पीककर्ज मंजूर करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राहुरी (जि.अहमदनगर) येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे विभाजन करुन जळगाव येथे कृषी विद्यापीठ उभारण्याबाबत

**(२९) ५८५३० (२१-०४-२०२३). :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहुरी (जि.अहमदनगर) येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे विभाजन करुन जळगाव येथे कृषी विद्यापीठ उभारण्याबाबत शासनाने घोषणा केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घोषणेच्या अनुषंगाने शासनाने अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी जळगाव येथील कृषी विद्यापीठाच्या स्थापनेबाबत शासनाची भूमिका काय आहे व याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०७-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला व महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी या दोन कृषि विद्यापीठांचे विभाजन करुन स्वतंत्र कृषि विद्यापीठ स्थापन करणेसंदर्भात शासनास मार्गदर्शन करण्यासाठी डॉ.वाय.एस.पी.थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. तथापि, यासंदर्भात अंतिम निर्णय झालेला नाही.

(३) महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत मौजे काष्टी, ता.मालेगाव, जि.नाशिक येथे कृषि विज्ञान संकुल स्थापन करुन त्याअंतर्गत शासकीय महाविद्यालये स्थापन करण्याबाबत घोषित करण्यात आले होते. त्यानुसार सन २०२०-२१ मध्ये कृषि विज्ञान संकुलाची स्थापना करण्यात आली असून यामध्ये पाच शासकीय कृषि व संलग्न अभ्यासक्रमांची महाविद्यालये सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे विभाजन करुन याच क्षेत्रात पुन्हा नव्याने स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील डोळखांब परिसरातील खराडे ग्रामपंचायत हद्दीत अनधिकृत बांधकाम तसेच उत्खनन सुरु असल्याबाबत

**(३०) ५८७७६ (०९-०५-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील अतिदुर्गम भाग असलेल्या डोळखांब परिसरातील खराडे ग्रामपंचायत हद्दीत मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकाम, उत्खनन, ब्लास्टिंग, वृक्षतोड तसेच किन्हवली परीसरातील सावरोली सो. ग्रामपंचायत हद्दीत विना परवानगी माती उत्खनन करून अवैध बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास दिनांक २ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास शहापूर तहसिलदार यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, उक्त हद्दीतील बांधकाम विकासकाविरोधात येथील ग्रामपंचायतीने शहापूर तहसिलदार यांच्याकडे उत्खनन, संरक्षण भिंत बांधकाम याबाबत तत्सम परवानग्या घेतल्या आहेत की नाही, किंवा शासनाकडे उत्खनन करत असतांना स्वामीत्व भरले आहे की नाही, याबाबतची स्थल पाहणी करुन पंचनामा करण्याचे आदेश तहसिलदार यांनी डोळखांब मंडळ अधिकारी यांना माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदेशानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने संबंधित दोषीवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-०७-२०२३) :**(१),(२), (३) व (४)

मौजे खराडे, ता. शहापूर येथील स.नं. ३९८/२, स.नं. ३९८/२/१ व स.नं.३७०/४ तसेच मौजे सावरोली , ता. शहापूर येथील स.नं.२४१/२ मधील क्षेत्रातून विना परावाना गौण खनिज उत्खनन केल्याच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारीच्या बाबत केलेल्या चौकशी मध्ये संबंधितानी गौण खनिजाचे अवैध उत्खनन केल्याचे आढळून आल्याने संबंधितास तहसिलदार, शहापूर यांच्याकडून दिनांक ०९.०५.२०२३ रोजी रू.९,८५,०००/- दिनांक २१.०२.२०२३ रोजी रू.१६,०४,०४६/- व दिनांक १२.०१.२०२३ रोजी रू.७,१३,६९६/- असे एकुण रू.३३,०३,४१०/- इतक्या रकमेच्या दंडात्मक नोटीसा महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४८ (७) व ४८ (८) अन्वये देण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही तहसिलदार, शहापूर यांच्याकडून करण्यात येत आहे.

---

**सुरत हैद्राबाद या राष्ट्रीय महामार्गाच्या मोजणीचे शेतक-यांनी बंद केलेल्या कामाबाबत**

**(३१) ५८८२७ (२१-०४-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहुरी (जि.अहमदनगर) तालुक्यातील सडे व खंडाबे या गांवातील सुरत हैद्राबाद या राष्ट्रीय महामार्गाच्या संपादित करावयाच्या जमीनीच्या मोजणीचे तसेच सर्वेक्षणाचे काम माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शेतक-यांनी बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गासाठी संपादित करावयाच्या जमीनीसाठी शासन किती मोबदला देणार आहे याचा खुलासा शासनाने केल्याशिवाय मोजणी होऊ न देण्याचा निर्णय येथील शेतक-यांनी घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नमूद महामार्गासाठी करावयाच्या जमीन संपादनासाठी शेतक-यांना समृध्दी महामार्ग प्रकल्पाच्या धर्तीवर नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१) व (२) होय.

(३) समृध्दी महामार्ग प्रकल्पाचे भूसंपादन हे शासन निर्णय दि.१२.०५.२०१५ खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने भूसंपादन झालेले आहे. सुरत - हैद्राबाद महामार्गाचे भूसंपादन हे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ व नवीन भूसंपादन कायदा २०१३ च्या तरतुदीनुसार करावयाचे आहे त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

सुरत - नाशिक एक्सप्रेसचे ग्रीनफिल्ड अहमदनगर नवीन राष्ट्रीय महामार्गासाठी राहुरी तालुक्यातील १९ गावांतील जमीनीचे ( From Km २४९.२ to Km २९२.४ ) भूसंपादनाची कार्यवाही सक्षम प्राधिकारी भूसंपादन तथा उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचेकडून सुरु आहे. त्यापैकी मौ.राहुरी खु (अंशत:) मौ. राहुरी बु, मौ सडे (अंशत:), मौ.खडांबे बु . वगळता उर्वरित १५ गावांची मोजणी पूर्ण झालेली आहे.मौ. राहुरी खु गावातील १४ गटांपैकी १ गटाची व मौ.सडे या गावातील एकूण २ कि.मी. अंतरापैकी कृषी विद्यापीठाच्या मालकीची १.५ कि.मी.अंतराची मोजणी पूर्ण झालेली आहे.

उर्वरित खाजगी मालकीची २१ गटांची ०.५ कि.मी.अंतराची मोजणी बाकी आहे. तसेच सदर गावातील मोजणीचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने व शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अहमदनगर स्तरावर दि.०३.१०.२०२२ व दि.०७.१०.२०२२ रोजी शेतकऱ्यांसोबत बैठक आयोजित करुन चर्चा केलेली आहे. चर्चेच्या समयी मोजणीस सहकार्य करणेकामी शेतकऱ्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केलेला आहे तसेच नमूद चारही गावांतील शेतकऱ्यांशी पुनश्च: चर्चा करुन संयुक्त मोजणीची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समुद्र किनाऱ्यालगतच्या तंबू धारकांना शासनाने अकृषिक कराच्या शासन परिपत्रकाबाबत नवीन आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात आल्याबाबत**

**(३२) ५९४११ (२१-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्र किनाऱ्यालगतच्या तंबू धारकांना शासनाने अकृषिक कराच्या शासन परिपत्रकाबाबत नवीन आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतांनाही स्थानिक तहसिलदारांकडून कर भरण्याबाबत नोटीसा काढण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कारवाई दिनांक २५ जानेवारी, २०२३ पर्यंत न थांबल्यास आंदोलन करण्याचा इशारा सिंधुदुर्ग जिल्हा तंबू चालक-मालक संघटनेने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.

शासन परिपत्रक क्र.एनएपी २०१५/प्र.क्र.४७/टी-१, दि.०५/०२/२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार अकृषिक आकरणी करुन ती वसुलीस स्थगिती उठविण्याबाबत व सुधारित अकृषिक प्रमाणदराच्या आधारे, अकृषिक आकरणी करुन ती वसुली करण्यासंदर्भात दिशा निर्देश निर्गमीत करण्यात आलेले आहेत. सदर निर्णयानुसार साधारणपणे सन २००१ ते २००६/२००६ ते २०११/२०११ ते २०१६ / २०१६ ते २०२१ अशा हमी कालावधीत कशाप्रकारे अकृषिक दर निश्चीत करुन बिनशेती साऱ्याची रक्कम आकारणी करावी, याबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करुन अकृषिक कराची आकारणी वसुल करण्याच्या अनुषंगाने दिशानिर्देश देण्यात आलेले होते.

या अनुषंगाने दि.०५.०२.२०१८ च्या शासन परिपत्रकात नमुद केलेल्या दिशानिर्देशाप्रमाणे क्षेत्रीय स्तरावर करण्यात येणाऱ्या अकृषिक कराच्या वसुलीस पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरती स्थगिती दिलेली आहे, आणि या अनुषंगाने सक्तीच्या वसुलीसंदर्भात केलेली कार्यवाही थांबविण्यात यावी, असे निर्देश शासन पत्र क्र. एनएपी-२०२२/प्र.क्र.५०/ज-१अ,दि.०७/०४/२०२२ पत्रान्वये निर्देश दिले आहेत.

(२) हे खरे नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यात समुद्र किनाऱ्यालगत तंबु धारक नसल्याने याबाबत स्थानिक तहसिदारांकडून कोणत्याही नोटीसा काढण्यात आल्या नाहीत.

(३) सिंधुदुर्ग जिल्हा तंबू चालक- मालक संघटनेकडून याबाबतचे क्षेत्रीय कार्यालयास पत्र प्राप्त झाल्याचे दिसू आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यात थकीत पीक कर्जाच्या वसुलीकरिता बँक ऑफ महाराष्ट्राने दिलेल्या कर्जदार शेतकऱ्यांना नोटीस दिल्याबाबत**

**(३३) ५९९८५ (२१-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात थकीत पीक कर्जाच्या वसुलीकरिता बँक ऑफ महाराष्ट्राने कर्जदारांना नोटीसा पाठविल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमाफी योजनेंतर्गत २०१९ पर्यंतचे थकीत कर्ज माफ केले असता, त्यासोबतच दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांचे दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ करण्याबाबत आश्वासन शासनाने दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कर्ज माफ करण्याचे आश्वासन देऊनही दोन लाखांच्यावर कर्ज घेतलेल्या व दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांचा कर्जमाफीऐवजी बँक ऑफ महाराष्ट्र बँकेकडून शेतकऱ्यांना नोटीस पाठविली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी नोटीसासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास विषय मांडला होता तरीही शेतकऱ्यांना बँकेने दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी वकिलामार्फत नोटीसा पाठविल्याने शेतकऱ्यांमध्ये भिती पसरल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे कय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०४-०७-२०२३) :**(१) होय
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय.
(४) नाही.
(५) लागू नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भूकंप पुनर्वसित गावातील मोजणीच्या कामासाठी उपाधिक्षक भूमिअभिलेख व दोन मोजणीदार यांची स्वतंत्र नियुक्ती करण्याबाबत

**(३४) ६०४२४ (२१-०४-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किल्लारी येथे दिनांक ३० सप्टेंबर, १९९३ रोजी वा त्यासुमारास झालेल्या प्रलयंकारी भुकंपास २९ वर्ष पूर्ण झाली असून पुनर्वसित गावातील शेतीच्या,शेतरस्त्यांच्या,जुने गावठाण,गायरान जमिनी व घरांच्या प्लॉटच्या वैयक्तिक व सार्वजनिक मोजणीची प्रकरणे प्रलंबित असल्याने व तालुका स्तरावर कार्यालयाकडे असलेला कामाचा व्याप व अपुरे मनुष्यबळ पाहता उक्त भूकंपातील प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणे निकाली काढण्यासाठी स्वतंत्र उपाधीक्षक भूमी अभिलेख व दोन मोजणी कर्मचारी नियुक्त करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सन २०२२ याकालावधी मध्ये निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०७-२०२३) :** (१) हे अंशत:खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) उप अधीक्षक भूमि अभिलेख, औसा कार्यालयांतर्गत भूकंपग्रस्त "अ व ब" वर्गाच्या संपादीत गावांच्या गावठाणाच्या हद्द कायम करणेसाठी ४८ गावांचे प्रस्ताव प्राप्त झालेले होते.
सदर गावांची गांवठाण मोजणी तलाठी, मंडळ अधिकारी व ग्रामसेवक यांचे समक्ष करुन माहे मे, २०२३ अखेर गांवठाण क्षेत्राच्या हद्दीच्या खुणा कायम करण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत पुनर्वसन गांवठाण मोजणीचे कोणतेही काम प्रलंबित नाही.

सदर कार्यालयाकडून, औसा तालुक्यातील एकूण ५८२ पैकी, ४२१ शेतरस्त्यांची मोजणी करण्यात आलेली आहे. आता, तहसीलदार, औसा कार्यालयाने तारखा निश्चित केल्यानंतर उर्वरित १६१ शेतरस्त्यांच्या मोजणीची कार्यवाही उपलब्ध कर्मचारी यांची सेवा वापरुन निकाली करणेची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात मागील वर्षी महापुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची कर्ज माफी तसेच आर्थिक मदत करण्याबाबत

**(३५) ६०५९३ (२१-०४-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील वर्षी अतिवृष्टी व महापुरामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे पूर्णतः नुकसान होऊन उत्पन्न न मिळाल्याने शेतकरी कर्जाची रक्कम कशाप्रकारे भरणार असा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच यासंदर्भात ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्यांचे पीक होणार नाही अशा शेतकऱ्यांना शासनाने मदत केली असून अशा शेतकऱ्यांकडून कर्जाची रक्कम कशाप्रकारे भरली जाईल असाही प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने पूरपीडित व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे व तद्नुसार शासनाने पूरपीडित व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कर्ज माफी व आर्थिक मदत जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०४-०७-२०२३) :**(१) नाही.
(२), (३), व (४) माहे जून ते ऑक्टोंबर, २०२२ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानाकरीता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषापेक्षा दुप्पट दराने व ३ हेक्टरच्या मर्यादेत शेतीपिकांच्या व मालमत्तेच्या नुकसानाकरीता शासन निर्णय दि.२२.०८.२०२२ अन्वये देण्यात आलेल्या दरानुसार रुपये ७०९३.१९ कोटी इतका निधी मंजूर करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## भोर व वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील तहसिलदार यांना जिल्हयाच्या ठिकाणी जाण्यासाठी देण्यात आलेली वाहने मुदतबाहय झाल्याबाबत

**(३६) ६०६३८ (२१-०४-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील तहसिलदार यांना लोकांच्या समस्या सोडविण्यसाठी तसेच जिल्हयाच्या ठिकाणी जाण्यासाठी देण्यात आलेली वाहने मुदतबाहय झाल्यामुळे त्यांना नवीन वाहन उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १० ऑगस्ट , २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकषीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) तहसिलदार,भोर,जि. पुणे यांचे वाहन क्रमांक एमएच-१२ एएच-८११९ या जुन्या निर्लेखित वाहनाच्या बदली नवीन वाहन खरेदी करण्यास महसूल व वन विभाग,शासन निर्णय दि.०८/०६/२०२३ अन्वये मंजूरी दिली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाळीसगाव येथे प्रस्तावित मोसंबी व कागदी लिंबू संशोधन व तंत्रज्ञान केंद्र मंजुर होण्याबाबत

**(३७) ६०६६४ (२१-०४-२०२३). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जि.जळगाव) येथे मोसंबी व कागदी लिंबू संशोधन व तंत्रज्ञान केंद्र मंजुर करण्याबाबत महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या दिनांक १३ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास कृषी परिषद कार्यालय, पुणे येथे झालेल्या ९० व्या बैठकीत प्रस्तावावर ठराव पारित करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संशोधन केंद्रासाठी रुपये ८५८.९८ लक्ष खर्चाच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ जुलै, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार कृषी व प.दु.म. विभागाच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना त्यांच्या अभिप्रायासह तात्काळ अहवाल शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०७-०७-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) चाळीसगाव (जि.जळगाव) येथे मोसंबी व कागदी लिंबू संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी एकूण रु.१२६२.७४ लाख इतक्या रकमेच्या सुधारित प्रस्तावास महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी मान्यता प्रदान केली असून शासनाकडे शिफारस केली आहे. चाळीसगाव (जि.जळगाव) येथे मोसंबी व कागदी लिंबू संशोधन केंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावाबाबत शासनस्तरावर अद्याप निर्णय झालेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर येथे अद्ययावत चित्रनगरी उभारण्याबाबत-....

**(३८) ६१०७१ (२०-०४-२०२३). श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथे चित्रनगरीत चित्रीकरणासाठी अद्ययावत सोयीसुविधा निर्माण करण्याचा निर्णय सांस्कृतिक कार्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या संचालक मंडळांची बैठक दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास आयोजित बैठकीत घेण्यांत आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीत चित्रनगरीच्या अधिकाधिक विकास आणि आधुनिकीकरणाचे नियोजन करुन याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याबरोबरच आवश्यक त्या निविदा काढण्याबाबतच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना आदेशित करण्यांत आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बैठकीत सौरऊर्जा प्रकल्प बसविणे, बाहयस्तोत्रावर सुरक्षारक्षक पुरवणे, कर्मचारी पुरवणे, कोल्हापूर चित्रनगरीत आवश्यक तेथे पथदिवे लावणे, पाण्याची उच्चतम टाकी बांधणे याबाबतही चर्चा होऊन निर्णय घेण्यांत आला असल्याचेही निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सांस्कृतिक कार्य मंत्री यांचे अध्यक्षतेखालील झालेल्या सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०७-२०२३) :** (१) , (२) , (३) व (४) होय, हे खरे आहे.
विविध कामांची अंदाजपत्रके बनविणे, त्या अंदाजपत्रकांना मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे यांची अंतिम तांत्रिक मान्यता घेणे तसेच निविदा प्रक्रिया राबविणे याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील तलाठयाची अनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(३९) ६११०६ (२१-०४-२०२३). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील तलाठयाची अनेक पदे गेल्या कांही वर्षापासून रिक्त असल्यामुळे तालुक्यातील जवळपास १०० गावांचा कार्यभार केवळ १७ तलाठयांवर असल्याने सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या नियमित कामाकरिता त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साधारणतः २ ते ३ गावांसाठी एक तलाठी सजा असतो परंतू तालुक्यातील एका तलाठयाकडे जवळपास ८ ते १० गावांचा अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे नागरीकांना आपल्या कामानिमित्त तलाठयांचा शोध घेत फिरण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार तालुक्यातील तलाठयाची रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१), (२), (३) व (४)
नांदगाव तालूक्यात तलाठी संवर्गाची एकूण-२७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १७ पदे कार्यरत व १० पदे रिक्त आहेत. तसेच नांदगाव तालुक्यात १८ तलाठी सजे नव्याने निर्माण करण्यात आले आहेत.
नवीन तलाठी सजा पुर्नरचने नुसार ४५ सजे झाल्यामुळे साधारणत: २ ते ३ गावांसाठी १ तलाठी सजा निर्माण झालेला आहे. तथापि नवीन तलाठी सजा पदनिर्मिती नुसार पद भरती झालेली नाही. त्यामुळे सद्यस्थितीत सदर रिक्त पदांमुळे कामकाजावर परिणाम होऊ नये याकरिता लगतच्या साजेच्या तलाठी यांचेकडे अतिरीक्त कार्यभार सोपविलेला आहे. त्यामुळे मुळ कार्यभार पाहून अतिरिक्त कार्यभार पाहतांना साजेनिहाय कामकाजाचे नियोजन करुन महसूली कामकाजावर परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्यात आलेली आहे.
आता, शासनाने राज्यात तलाठी संवर्गाची दि. ३१.१२.२०२० अखेर रिक्त असलेली-१०१२, नवनिर्मित सजे करिता तलाठी संवर्गाची नव्याने निर्माण करण्यात आलेली-३११० आणि दि.०१.०१.२०२१ ते दि. ३१.०८.२०२३ अखेर रिक्त पदांच्या ८०% मर्यादेत येणारी पदे अशा तलाठी पदांची भरती प्रक्रिया करण्यास मान्यता दिलेली आहे.
नांदगाव तालुक्यातील १८ नवनिर्मित सजा सह नाशिक जिल्हयांतील १५७ नवनिर्मित तलाठी पदांच्या भरती करीता मागणीपत्र सादर करण्यात आलेले आहे. त्यानुसार नवीन उमेदवार उपलब्ध होताच नांदगाव तालुक्यातील रिक्त तलाठी पदे भरण्याची तजवीज ठेवली आहे.

---

## मुंबइतील गोराई व दहिसर येथे कांदळवन उद्यान निर्मितीबाबत

**(४०) ६१२३८ (२१-०४-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोराई व दहिसर येथे अनुक्रमे आठ व तीस हेक्टरवर कांदळवन उद्यान विकसीत केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कांदळवन उद्याने विकासित करण्याचा उद्देश काय आहे, तसेच उद्यानाच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचा उद्देश कशाप्रकारे होणार आहे काय,

(३) असल्यास, सदर उद्यानाच्या माध्यमातून नविन पर्यटन क्षेत्र निर्मितीचा शासनाचा मानस आहे काय व पर्यटन आराखडा तयार करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०७-२०२३) :** (१) हे अशंत: खरे आहे.

मौजे गोराई येथील न.भु.क्र. ८८३ मध्ये मॅग्रोव्ह संवर्धन केंद्र आणि कांदळवन उद्यानाचे काम प्रगथीपथावर आहे. सदर प्रकल्पाकरीता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत ०.२२६ हे.आर वन जमीन वळतीकरणास केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे. तसेच मौजे दहिसर येथील न.भु.क्र. ३१२९ व ३१३८ मध्ये कांदळवन उद्यानाचे काम प्रस्तावित आहे. या प्रकल्पाकरीता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत ०.९३७५ हे. आर वनजमीन वळतीकरणास केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे.

(२) व (३) खारफुटी आणि सागरी किनारपट्टीच्या जैवविधितेचे महत्त्व याबद्दल जागरुकता निर्माण करण्याचा एक भाग म्हणून गोराई आणि दहिसर येथे कांदळवन संवर्धन केंद्र आणि कांदळवन उद्यान प्रस्तावित करण्यात आले आहे. प्रस्तूत कांदळवन उद्यान प्रकल्पास महाराष्ट्र राज्य इको-टुरिझम बोर्डाने मान्यता दिली आहे.

कांदळवन उद्याने विकसीत करण्याचा उद्देश व संकल्पना संक्षिप्त स्वरुपात पुढीलप्रमाणे :

अ. लोकांमध्ये कांदळवनाबाबत जनजागृती निर्माण करणे.

ब. कांदळवन क्षेत्राला प्रत्यक्ष भेट देवून कांदळवन क्षेत्राची माहिती व मनोरंजन हे हेतू साध्य करुन जन प्रबोधन करणे.

क. उद्यानाच्या माध्यमातून पर्यटनामधून कांदळवनाप्रती विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करणे, स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

ड. किनारी व सागरी जैवविविधतचे महत्व या बद्दल लोकांना समजावणे ई. या उद्देशाच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचा उद्देश साध्य करणे.

(४) गोराई कांदळवन उद्यानास दिनांक ७.९.२०१९ अन्वये नियोजन विभागाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार ई-निविदा प्रक्रिया पुर्ण करुन ठेकेदारास दिनांक १२.७.२०२१ रोजी कार्यरंभ आदेश देण्यात आले असून सदर प्रकल्पाचे सद्यस्थितीत ८०% काम पूर्ण झाले आहे व उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. तसेच दहिसर कांदळवन उद्यान उभारण्याकरीता ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली असून त्याबाबत पुढील कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद व कळंब या दोन्ही तहसील कार्यालयात रिक्त पदांवर नायब तहसीलदार नेमणूक करण्याबाबत

**(४१) ६१२४७ (११-०५-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद व कळंब तहसील कार्यालयात प्रत्येकी २ नायब तहसिलदारांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तहसील कार्यालयात प्रत्येकी एक नायब तहसिलदार हे ६ महिन्यासाठी परिविक्षाधीन तहसीलदार म्हणून कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तहसिल कार्यालयातील रिक्त नायब तहसिलदार पदांवर नेमणूक करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अद्यापपर्यंत या ठिकाणी नायब तहसीलदारांची नियुक्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त दोन्ही तहसील कार्यालयात रिक्त नायब तहसीलदार पदांवर नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली,वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) अशा आशयाचे निवेदन विभागास सादर झाल्याचे दिसून येत नाही. मात्र सन २०२३ च्या सर्वसाधारण बदल्यांमध्ये श्री. गणेश पोलास यांची नायब तहसिलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथे पदस्थापना करण्यात आली आहे. तसेच सन २०२३ च्या विनंती बदली प्रस्तावामधून, सीपीटीपी-७ तसेच औरंगाबाद विभागाच्या अव्वल कारकून/मंडळ अधिकारी संवर्गातून नायब तहसिलदार संवर्गाच्या पदोन्नती प्रस्तावातून कळंब व उस्मानाबाद तहसिल कार्यालयातील पदे प्राधान्याने भरण्याचे प्रस्तावित आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यामधील शेतजमीन मोजणीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत,

**(४२) ६१२७० (२१-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यामधील शेतजमीन मोजणीची ४१३६ प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जिल्ह्यातील शेतजमीन मोजणीची प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर मार्गी लावण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व प्रकारची ४९४२ इतकी मोजणी प्रकरणे मार्च २०२३ अखेर प्रलंबित होती.
(२) व (३) कोल्हापूर जिल्ह्यात माहे मार्च २०२२ अखेर सर्व प्रकारची एकूण ५६४८ मोजणी प्रकरणे प्रलंबित होती. त्यानंतर माहे एप्रिल २०२२ ते एप्रिल २०२३ अखेर ९९१४ मोजणी प्रकरणांची आवक झालेली असून या १५५६२ मोजणी प्रकरणांपैकी १०६१७ निकाली झालेली आहेत. एप्रिल २०२३ अखेर एकूण ४९४५ शिल्लक प्रकरणे होती.

कर्मचा-यांच्या तुलनेत मोजणी प्रकरणांची आवक जास्त असणे, स्वामित्व योजनेचे काम तसेच जुलै ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत पावसाचे जास्त प्रमाण यामुळे मोजणी प्रकरणांच्या प्रलंबिततेची संख्या जास्त राहिली आहे.

सदर प्रलंबित मोजणी प्रकरणांचा निपटारा करण्याच्या दृष्टीने भूकरमापकास मदतनिस म्हणून नेमणूक करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

भूमी अभिलेख विभागामध्ये रिक्त असलेली सरळसेवेची १२६८ पदे भरण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली असून पात्र ठरलेले उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.

---

## बुलढाणा जिल्ह्यात पंतप्रधान सन्मान निधी योजनेंतर्गत अपात्र ठरलेल्या शेतक-यांकडून अनुदान वसूल केल्याबाबत

**(४३) ६१२८५ (२१-०४-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात पंतप्रधान सन्मान निधी योजनेंतर्गत मागील वर्षभरात अपात्र ठरलेल्या शेतकऱ्यांकडून माहे जानेवारी, २०२३ अखेरपर्यंत किती शेतकऱ्यांकडून अनुदानाची रक्कम वसूल करण्यात आली आहे,

(२) असल्यास, याप्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) तसेच उर्वरित शेतकऱ्यांकडून अनुदान वसूल करण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (३०-०६-२०२३) :** (१) बुलढाणा जिल्हयामध्ये आयकर भरणारे व इतर कारणांने अपात्र झालेल्या एकूण ४३,२१७ अपात्र लाभार्थीपैकी एकूण २,१०४ लाभार्थींकडून रक्कम रु. १.८८ कोटी वसूल करण्यात आली आहे.

(२) बुलढाणा जिल्हयाची आयकर भरणारे व इतर कारणांने अपात्र झालेल्या लाभार्थींची वसूली सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| बाब | एकूण अपात्र लाभार्थी संख्या | वसूल करावयाची रक्कम रु. कोटीत | वसूल केलेली लाभार्थी संख्या | वसूल केलेली रक्कम रु. कोटीत |
|---|---|---|---|---|
| आयकर भरणारे | ११४०९ | १४.०५ | २०५९ | १.८५ |
| इतर कारणांने अपात्र | ३१८०८ | ४९.०४ | ४५ | ०.०३ |
| एकूण | ४३२१७ | ६३.०९ | २१०४ | १.८८ |

उर्वरीत अपात्र लाभार्थ्यांकडून क्षेत्रीयस्तरावर वसूलीची कार्यवाही सुरू आहे.

(३) अपात्र लाभार्थ्याकडून रक्कम वसूल करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी तसेच जिल्हा नोडल अधिकारी पी.एम. किसान योजना तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांना वेळोवेळी सूचना निर्गमीत केलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील वृद्ध कलावंतांना मानधन मिळत नसल्याबाबत

**(४४) ६१४१४ (२१-०४-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील वृद्ध कलावंत मानधन समिती अंतर्गत ३०० कलावंतांची निवड करणे आवश्यक असताना ३७ पात्र वृद्ध कलावंतांना पात्रता यादी मधून डावल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,स्थानिक जिल्हा समाज कल्याण अधिकारी व कर्मचारी यांच्या भ्रष्ट कार्यशाहीमुळे शासन निर्णयातील अटी व शर्तीचे उल्लंघन करून ३७ पात्र वृद्ध कलावंतांना मानधनापासून वंचित ठेवल्याप्रकरणी वृद्ध कलावंतांनी पैनगंगा नदीच्या पात्रात आंदोलन करीत अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त कलावंताना मानधन देण्याबाबत तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४ )नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या वित्तिय वर्षातील एकूण प्राप्त १७५३ अर्जांपैकी शासन निर्णय दि.७ फेब्रुवारी, २०१४ च्या अटी व शर्तीनुसार २६३ पात्र परिपूर्ण अर्जास जिल्हास्तरीय वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन समितीने मंजूरी प्रदान केली आहे. सदर २६३ कलावंतांचे मानधन दि. ३ मार्च, २०२३ रोजी त्यांच्या खात्यात जमा केले आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.
शासन निर्णयातील अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्याचे दिसून येत नाही.

---

**मौजे चंचळी व शेंदूरजणे, (ता.कोरेगांव, जि.सातारा) येथे कागदोपत्री असणारी इनाम वर्ग ३ ही नोंद कमी करण्याबाबत**

**(४५) ६१७१९ (२१-०४-२०२३). श्री.महेश शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे चंचळी व शेंदूरजणे (ता.कोरेगांव, जि.सातारा) येथे कागदोपत्री असणारे इनाम वर्ग ३ ही नोंद कमी करण्यात येऊन कुळ कायदा, १९४८ तसेच गुजरात देवस्थान इनाम ॲबोलिटिशन ॲक्ट, १९६९ च्या धर्तीवर कायदा करण्यात येऊन सदरील जमिनी खालसा करण्याबाबत सर्व समावेशक असा योग्य तो निर्णय व्हावा तसेच देवस्थान जमिनींना असणारे कुळांनाही पूर्ण अधिकार देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१) व (२) राज्यातील देवस्थान इनाम वर्ग-३ जमिनीबाबत तशी नोंद कमी करणे आणि गुजरात देवस्थान इनाम ॲबोलिटिशन ॲक्ट, १९६९ च्या धर्तीवर कायदा करण्याच्या अनुषंगाने आणि राज्यातील देवस्थान जमिनींच्या संदर्भात शासनाची भूमिका ठरविण्याकरीता शासनास शिफारशी करण्याकरिता अ.मु.स. (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२३ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये अभ्यास समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल लवकरच शासनास सादर होणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील भूमी अभिलेख कार्यालयात उप संचालक यांच्याकडून होत असलेल्या अनियमिततेबाबत**

**(४६) ६१८२७ (२१-०४-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील भूमी अभिलेख कार्यालयात वडीलांचे नावे असलेल्या शेतजमिनीचा भूमी अभिलेख कार्यालयाने तयार केलेला हिस्सा नमुना १२ मध्ये लिखाण प्रमादाची चुक दुरुस्तीचे आदेश देण्यासाठी उपसंचालक यांनी १ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक येथील भूमी अभिलेख कार्यालयात अधिक्षक, उप अधिक्षक यांचा मोठ्या प्रमाणात अनागोंदी कारभार सुरु असून मौजे म्हसरुळ व मौजे गंगाव हे येथील शेतक-यांच्या शेतजमिनी मोजणी कामात गैरकारभार झाल्याने संबंधित शेतक-यांनी थेट आयुक्त जमाबंदी, पुणे यांच्याकडे तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित शेतक-यांच्या तक्रारीनंतर उप अधिक्षक यांनी संबंधित शेतक-यांची मोजणी प्रकरणे गहाळ करणे, बिल्डरांच्या लाभात काम करणे असे प्रकार घडून येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
तत्का. जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, नाशिक यांनी मौजे दसाणे येथील शेत गट नं. १०० चे ७/१२ मधील धारकांचे शेतीयोग्य व खराब्याचे क्षेत्र तयार करण्यात आलेले हिस्सा फॉर्म ११ व १२ मध्ये दुरूस्तीबाबत उप अधीक्षक भूमी अभिलेख, मालेगाव यांचेकडुन आलेल्या प्रस्तावावर आदेश देण्यासाठी लाचेची मागणी केली. सदर लाच त्यांनी दि.३१.०१.२०२३ रोजी स्वीकारली असता त्यांना ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक यांच्या सापळा पथकाने पकडले आहे.
(२) मौजे गंगावऱ्हे व मौजे म्हसवड येथील शेतकऱ्यांकडून तक्रार अर्ज प्राप्त झाले आहेत हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, पुणे कार्यालयाने प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित अर्जदार यांच्याबरोबर दिनांक ९.०२.२०२३ रोजी बैठक घेतली आहे. तसेच जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक कार्यालयाची तपासणी करण्यासाठी उपसंचालक भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश नाशिक या कार्यालयाच्या दिनांक १०.०२.२०२३ रोजीच्या आदेशान्वये तपासणी पथक नेमण्यात आले होते. सदर तपासणी पथकाच्या अहवालास अनुसरुन संबधीत जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा(शिस्त व अपील), १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महात्मा फुले कृषि विद्यापीठासह महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे कृषि सेवामुख्य परिक्षा २०२१-२२ ला स्थगिती देऊन अभ्यास पूर्वीप्रमाणे घेण्याबाबत

**(४७) ६२९२१ (२०-०४-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा फुले कृषि विद्यापीठासह दापोलीच्या डॉ.बाळासाहेब सावंत कोकण विद्यापीठ, अकोल्याच्या डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, परभणीच्या वसंतराव नाईक कृषि विद्यापीठात महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे कृषि सेवा मुख्य परिक्षा २०२१-२२ ला तत्काळ स्थगिती देऊन अभ्यासक्रम पूर्वीप्रमाणे करावेत यासह इतर मागण्यांसाठी शासकीय व खासगी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणारे, उत्तीर्ण झालेले व पीएचडी करणारे हजारो विद्यार्थी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान ठिया आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनावर प्रधान सचिव (कृषि) यांना तपासून प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आदेशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०७-०७-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कृषि सेवा मुख्य परिक्षेच्या अभ्यासक्रमात बदल केल्यानंतर राज्यातील चारही कृषि विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने,कृषि शिक्षणातील सर्व विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना समान संधी मिळण्याच्या दृष्टीने राज्य लोकसेवा आयोगाने बदल केलेल्या अभ्यासक्रमाबाबत फेरविचार करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कृषि परिक्षेच्या अभ्यासक्रम तयार करण्याकरीता विद्यापीठाच्या कुलगुरुंकडून प्राप्त झालेली तीन तज्ञांची नावे अंतिम केलेली होती व सदर समितीकडून तयार केलेला अभ्यासक्रम लोकसेवा आयोगाच्या बैठकीमध्ये सादर करुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेने तो अंतिम करण्यात आला आहे.महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही सांविधानिक व स्वायत्त संस्था असून स्पर्धा परिक्षेसाठी अभ्यासक्रम व परिक्षा निश्चित करणे ही बाब संपूर्णत: आयोगाच्या अखत्यारीतील असल्याचे शासनास

कळविले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अंतिम केलेला अभ्यासक्रम व परीक्षा योजनेनुसार परीक्षार्थींनी परीक्षेला सामोरे जाणे आवश्यक असल्याचेही लोकसेवा आयोगाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील कोतवालांना गट "ड" (शिपाई) चतुर्थ श्रेणी पदावर सन २०१८ नंतर पदोन्नती देण्याबाबत**

**(४८) ६२९४१ (२१-०४-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील कोतवालाना गट "ड" (शिपाई) चतुर्थ श्रेणी पदावर सन २०१८ याकालावधी नंतर पदोन्नती देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकप्रतिनिधींनी शासनाकडे व जिल्हा प्रशासनाकडे जिल्ह्यात शिपाई गट "ड" चे अनेक पदे रिक्त असल्याने व जिल्यातील तहसील कार्यालयात शिपाई व लिपिकच्या पदावर कोतवालाची नियुक्ती करून काम केली जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे, लातूर, जालना, उस्मानाबाद, हिंगोली इत्यादी जिल्ह्यात सन २०२२ याकालावधीमध्ये कोतवालाना पदोन्नती देण्यात आलेल्या असुन पदोन्नतीचे प्रस्ताव निकाली काढण्याच्या दृष्टीने सा.प्र.वि. दि.०१.०८.२०१९ च्या शासन निर्णयानुसार आदेश निर्गमीत केलेले असताना बीड जिल्ह्यातील कोतवालांना पदोन्नती देण्यात आलेली नाही, याबाबतची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, प्रशासकीय कार्यपध्दतीमधील दिरंगाई दुर करून महसूल संवर्गातील पदोन्नतीचे प्रस्ताव निकाली काढुन बीड जिल्ह्यातील वर्ग "ड" शिपाई पदाचे रिक्त पदे भरून उच्च शिक्षित असलेल्या कोतवालांना न्याय मिळवुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) व (४) कोतवाल संवर्गाची ज्येष्ठता यादीचे अनुषंगाने रिट याचिका क्रमांक १६८९/२०२२ मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल असुन प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने पदोन्नती प्रक्रिया करण्यात आली नव्हती.
आता कोतवाल संवर्गातील कर्मचारी यांना शिपाई संवर्गात (गट-ड) पदोन्नती देण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, बीड कार्यालयाचे पत्र दि.३१.०३.२०२३ अन्वये सर्व तहसीलदार यांना पत्र देवुन कोतवाल संवर्गाची सन २०२३ ची सेवा ज्येष्ठता यादी करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच शिपाई संवर्गाची बिंदुनामावली प्रमाणित करुन घेण्यासाठी आवश्यक ते अभिलेख सादर करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांचे पत्र दि. १३.०४.२०२३ अन्वये सर्व तहसीलदार यांना कळविण्यात आलेले असुन विनाविलंब कोतवाल संवर्गातील कर्मचा-यांना पदोन्नतीचा लाभ देण्याची दक्षता घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अलिबाग (जि.रायगड) येथील वन विभागातील मजूरांना न्याय देण्याबाबत**

**(४९) ६३१७० (०९-०५-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील अलिबाग वन विभागातील वडखळ रेंजमध्ये सन १९९० चे दरम्यान रोजंदारी मजूरांनी सेवेत नियमित करण्यासाठी वन विभागाविरुद्ध औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे (यु.एल.पी.) ६१३/१९९१, दिनांक ०१/११/१९९१ अन्वये खटला दाखल केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.औद्योगिक न्यायालयाने सदर खटल्याचा निकाल दिनांक ३१/०३/२००० रोजी शासनाच्या विरुद्ध व मजूरांच्या बाजूने दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निकालाविरुद्ध शासनाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दिनांक ०३ मे, २००२ रोजी क्र.३२५६/२००२ अन्वये रिट पिटीशन दाखल केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने रिट पिटीशनवर दिनांक १५/०६/२०१८ रोजी पुन्हा खटल्याचा निकाल शासनाच्या विरुद्ध व मजूरांच्या बाजूने दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशाचा अवमान झाला असून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करता मजूरांना सेवेत नियमित न करणे तसेच सेवेचे कुठल्याही प्रकारचे लाभ न देणे यास झालेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(६) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित मजूरांना न्याय मिळण्यासाठी होत असलेल्या विलंबाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०४/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास मा.वने मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांनाही पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय.
(७) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करता हेतुपूरस्सर कार्यवाहीस विलंब करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांची चौकशी केली वा करण्यात येणार आहे काय,
(८) असल्यास, याप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर करण्यात आलेल्या चौकशीचे स्वरुप तसेच शासनाकडून संबंधित मजूरांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०६-२०२३) :** (१), (२), (३) व (४), हे खरे आहे.
(५), (६) (७) व (८) मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी तक्रार युएलपी क्रमांक ६१३/१९९१ मध्ये दिलेल्या निर्णयाची व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ३२५६/२००२ मध्ये दिनांक १५.०६.२०१८ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने देय होणारी वेतन थकबाकीची रक्कम रुपये ६,९८,३८८/- अदा करण्याच्या प्रस्तावास विधी व न्याय विभागाने दि.२७.०२.२०२३ रोजी सहमती दिली आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला असता, विधी व न्याय विभागाचे पुनश्च अभिप्राय घेऊन प्रस्ताव फेर सादर करण्याबाबत वित्त विभागाने कळविले आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव विधी व न्याय विभागास सादर करण्यात आला आहे. तद्नंत पुनश्च प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे.

---

**मौजे मिरा महाजनवाडी,(ता.जि.ठाणे ) येथील जुना सर्वे नं.१०७/१ पै.,नवीन सर्व्हे नंबर ३७/१ पै. मधील संपादित जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत..**

**(५०) ६३३१९ (२१-०४-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे महाजनवाडी (ता.जि.ठाणे) श्री.राजेंद्र चंद्रमा सिंह यांच्या मालकीचा जुना सर्व्हे नंबर १०७/१ पै.नवीन सर्व्हे नंबर ३७/१, जमिनीचे क्षेत्र ०.२८.५ आर.चौ.मी.इतके जमिनीचे क्षेत्र राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जमिनीचा मोबदला अद्यापही जमीन मालकांना देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत, याबाबत चौकशी करण्यांत आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१), (२) व (३) मौजे-मिरा-महाजनवाडी, ता.जि.ठाणे येथील जुना स.नं. १०७/१ पैकी क्षेत्र ०-१९-० हे.आर.चौ.मी. या जमिनीचे संपादन जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे अधिनस्त कार्यालयाकडुन झालेले आहे..

मौजे-मिरा, ता.जि.ठाणे येथील जुना सव्हे नं १०७/१ पैकी क्षेत्र ० १९-०० हे. आर. चौ. मी. ही जमिन में इस्टेट ऑफीसर ॲन्ड डेप्युटी कलेक्टर मुंबई यांचेकडील आदेशान्वये नॅशनल हायवे रोडसाठी संपादित करण्यात आली असलेचे अधिकार अभिलेखातील मंजुर फेरफार नोंद क्र. १२९७ दि.०९/०२/१९८४ वरुन दिसुन येते. यावरुन सदरची जमिन दि. ०९/०२/१९८४ पुर्वी संपादित झाली असल्याचे दिसून येते.

मौजे, मिरा या महसुल गावापासून मौजे महाजनवाडी हे नवीन महसूल गाव निर्मित झालेमुळे सर्व्हे नं. १०७/१ चा नवीन सर्व्हे नं. ३७/१ झालेचे मंजुर फेरफार नोंद क्र. १ दि. ०१/०४/१९९५ वरुन दिसुन येते.

मौजे महाजनवाडी ता.जि. ठाणे येथील सर्व्हे नंबर ३७/१ चे ३७/१अ, ३७/१ब व ३७/१क असे तीन ७/१२ सन २००३ साली निर्मित झालेचे मंजुर फेरफार नोंद क्रमांक ३८ वरून दिसून येते.

मौजे - महाजनवाडी, ता.जि.ठाणे येथील नवीन सर्व्हे नं. ३७/१क मधुन क्षेत्र ०-१७-२० हे आर.चौ.मी. पैकी ½ जमिन राजेंद्र चंद्रमा सिंह यांनी १) देवानंद काशिनाथ भोईर, २) चंद्रकला केसरीनाथ गुळवी, ३) उषा गोपाळ नाडार, ४) विमल बबन भोसले, ५) सुशिला श्रीनिवास गौडा व ६) वंदना कमळाकर पाटील

यांचेपासुन दस्त क्रमांक ५७२९/२०१० दि.३.५.२०१० अन्वये खरेदीने घेतलेली असल्याचे अधिकार अभिलेखातील मंजूर फेरफार नोंद क्र.१५८ वरुन दिसुन येत आहे.

मा. सिव्हील कोर्ट, ठाणे यांचेकडील कोर्ट डिक्री नं. स्पेशल सुट नं.१२०८/१९९४ दि.०५/०९/९५ रोजीचे आदेशावरुन जुना सर्व्हे नं.१०७/१ पैकी नवीन सर्व्हे नं. ३७/१क मधून क्षेत्र ०-१७.२० हे. आर. चौ. मी. पैकी ½ जमीन राजेंद्र चंद्रमा सिंह यांनी १)दिनानाथ  केशव भोईर २) रमेश दिनानाथ भोईर, ३) प्रेमा दिनानाथ भोईर ४) जयश्री दिनानाथ भोईर ५) कमल दिनानाथ भोईर यांचेपासून घेतलेली असल्याचे अधिकार अभिलेखातील मंजूर फेरफार नोंद क्र. १५९ वरुन दिसुन येत आहे. विशेष म्हणजे फेरफार नोंद क्रमांक १५८ आणि फेरफार नोंद क्रमांक १५९ रद्द झाले असून त्यास अंतिमतः प्राप्त झाली आहे. ही बाब लक्षात घेता प्रस्तुत जमिनीसंदर्भात राजेंद्र चंद्रमा सिंह यांना नुकसानभरपाई मागणेसंदर्भात अधिकाराच प्राप्त होत नाही असेही जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाचे मत आहे.”

तथापी,राजेंद्र चंद्रमा सिंह यांनी मोजे मिरा, नविन महाजनवाडी, ता. जि. ठाणे येथील जुना सर्व्हे नं. १०७/१ पैकी नवीन नं.३७/१क मधुन क्षेत्र ०-१७-२० हे.आर.चौ.मी. ही जमिन खरेदी करणेपुर्वीच दि.०१.०४.१९८४ रोजी मे. इस्टेट ऑफिसर अँड डेप्युटी कलेक्टर, मुंबई यांचेमार्फत नॅशनल हायवे रोडसाठी संपादित झाली असल्याचे अधिकार अभिलेखातील मंजुर फेरफार नोंद क्र. १२९७ वरुन दिसुन येत असल्याने राजेंद्र चंद्रमा सिंह यांना संपादित जमिनीचा मोबदला अदा करणेचा प्रश्न उद्भवत नसल्याचे अधिकार अभिलेखातील नोंदीवरून स्पष्ट होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.